ePaper भाजपला 30 वर्षे सत्तेची खात्री; 'क्लस्टर' प्रमुखांना अमित शहांचे मार्गदर्शन



| वर्ष - 7 । अंक - 248 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 17 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- हार्दिक पांड्यासाठी धोक्याची घंटा
- महारानी-3 चा जबरदस्त टीझर रिलीज!
- 'आप, उबाठा गट RSS चे छोटा रिचार्ज
- जरांगे मुंबईतील आंदोलनावर ठाम


# महिला सक्षमीकरण व विविध उत्पादनांसाठी 'पवना थडी' हक्काचे व्यासपीठ!

## शंकर जगताप यांचे मत: जत्रेत 850 पेक्षा जास्त बचत गटांचा सहभाग

**। पिंपरी ।महाईन्यूज । ।**

**पवनाथडी जत्रेच्या ।ध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून पिंपरी-चिंचवडमधील महिला बचत गटांच्या उत्पादनांना ब्रँडिंग व प्रमोशन यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे. त्यामुळे अनेक महिला बचत गट सक्षम बनत आहेत, असे मत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**



नवी सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानावर आयोजित पवनाथडी जत्रेत शंकर जगताप यांनी भेट दिली. त्याठिकाणी उभारण्यात आलेल्या महिला बचत गटांच्या स्टॉलला भेटी देऊन अनेक महिलांशी संवाद साधला. त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या उत्पादनांची व व्यवसायाची सविस्तर माहिती जाणून घेतली.

या जत्रेला आलेल्या अनेक ग्राहकांशीहीमनमुक्तसंवादसाधला. यावेळी माजी नगरसेवक सागर आंघोळकर, गणेश बँक संचालक प्रमोद ठाकर, भाजप सांगवी रहाटणी मंडल उपाध्यक्ष युवराज ढोरे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश लोंढे, जालिंदर नवले, जगदीश तांबे, मोहित लोंढे आदी उपस्थित होते.

> पवनाथडी जत्रेमुळे विविध वस्तू व पदार्थ तयार करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. त्यामुळे गृह उद्योगाला बळकटी देणारी ही जत्रा आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.महिला बचत गटांच्या कौशल्य आणि कलागुणांना वाव देणारी पवनाथडी जत्रा खऱ्या अर्थाने पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक परंपरेमध्ये भर घालणारी आहे.
>
> - **शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### पवना थडीची 16 वर्षांची परंपरा...

**»शहरी आणि ग्रामीण संस्कृतीने नटलेल्या तसेच पारंपारिक खेळांनी, सांस्कृतिक कार्यक्रमांनी आणि विविध आकर्षक, लोकपयोगी वस्तूंनी आणि चविष्ट खाद्यपदार्थांनी सजलेल्या पाच दिवसीय पवनाथडी जत्रेचा सोमवारी समारोप झाला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १६ वर्षांची परंपरा अबाधित ठेवत महापालिकेच्या वतीने पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले. गतवर्षीप्रमाणे यावर्षीही महिला बचत गटांनी जत्रेमध्ये सक्रीय सहभाग नोंदवत आपला स्टॉल लावून व्यवसाय केला आणि त्यातून लाखोंची उलाढाल केली.**

# बुद्धीवान पिढी भारतात परतणार!

## राज्यपाल रमेश बैस : अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाचा पदवीदान समारंभ

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारताला 2047 पर्यंत विकसनशील राष्ट्रातून विकसित राष्ट्र बनविण्याची क्षमता युवकांमध्ये असून एक काळ असा येईल की परदेशात अधिक चांगल्या संधींसाठी स्थलांतरित झालेली येथील बुद्धीवान युवा पिढी पुन्हा भारताकडे स्थलांतर करील, असा विश्वास राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केला.**

चऱ्होली बु. येथील अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या आठव्या पदवीदान समारंभात राज्यपाल बैस बोलत होते. विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील, विद्यापीठाचे कुलगुरू हृदयेश देशपांडे, अजिंक्य डी. वाय. पाटील समूहाच्या चेअरपर्सन श्रीमती पूजा पाटील, विविध विद्याशाखांचे अधीष्ठाता, विभागप्रमुख आदी याप्रसंगी उपस्थित होते.



देशाच्या राजकीय आणि आर्थिक स्थिरतेसाठी देशात सर्वसमावेशक विकास होणे गरजेचे आहे, असे सांगून राज्यपाल बैस म्हणाले, देशात 50 टक्के भारतीयांना कृषी क्षेत्र रोजगार प्रदान करत असताना कृषी, पशुवैद्यकशास्त्र, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन तसेच फलोत्पादन क्षेत्राकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या अनुषंगाने अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाने काही गावांना दत्तक घ्यावे आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने त्यांचा विकास करावा, असे आवाहन राज्यपालांनी केले.

### युवकांनी स्टार्टअप्सचे प्रवर्तक व्हावे!

»विविध विद्याशाखांमध्ये अग्रक्रम मिळविलेल्या, पदकप्राप्त तसेच पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन राज्यपाल पुढे म्हणाले, विकसित भारताच्या अनुषंगाने युवकांनी आपल्या कल्पना मांडाव्यात. चांद्रयान मिशन, सूर्य मिशन, आशियाई आणि इतर क्रीडा स्पर्धांमध्ये भारताचे यश यामुळे भारतीयांचा आत्मविश्वास वाढला असून त्यांच्यामध्ये कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करण्याची भावना निर्माण झाली आहे. हीच भावना युवकांनी आपल्या हृदयात ठेवावी आणि संपत्तीचे निर्माते आणि स्टार्टअप्सचे प्रवर्तक व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

> **विद्यार्थ्यांनी नवोन्मेषक आणि जोखीम घेणारे उद्योजक बनावे. आता भारतानेही स्वतःचे नवीन उद्योजक निर्माण करण्याची वेळ आली असून आपले व्यवस्थापन पदवीधर, अभियंते, शास्त्रज्ञ त्यांच्या स्वत: च्या जागतिक दर्जाच्या कंपन्या, सल्लागार कंपन्या तयार करतील.**
>
> **-रमेश बैस,** राज्यपाल

# महाराष्ट्रातील साखर उत्पादन वाढणार

## कारखान्यांमधील 25 किलोमीटरची अट रद्द होणार?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान बिगरमोसमी पाऊस झाल्याने ऊसाची उत्पादकता आणि साखर उताऱ्यामध्ये वाढ होण्याचा अंदाज वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने (विस्मा) वर्तविला आहे. हंगामाच्या पूर्वी ८८ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज होता. त्यात आता १० टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे. 'इथेनॉल'सह अन्य उपपदार्थांची निर्मिती वगळून एकूण साखर उत्पादनात ७.५ टक्के वाढ होऊन राज्यात चालू हंगामातील साखर उत्पादन ९५ लाख टन होईल, असे 'विस्मा'चे म्हणणे आहे.**



विस्माच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये राज्यातील खासगी व सहकारी साखर कारखान्यांच्या ३१ डिसेंबर २०२३ अखेर झालेले प्रत्यक्ष व अपेक्षित गाळप, साखर उत्पादन व साखर उताऱ्याचा कारखानानिहाय आढावा घेण्यात आला. राज्यात सध्या ९६ सहकारी व ९९ खासगी असे एकूण १९५ साखर कारखाने गाळप करीत आहेत. त्यांची गाळपक्षमता नऊ लाख टन प्रतिदिन आहे. राज्याचा गळीत हंगाम अंदाजे ९० ते १०० दिवसांचा अपेक्षित होता. डिसेंबरअखेर एकूण ९४६ लाख टन ऊस उपलब्धतेचा अंदाज होता. या अंदाजात पाच टक्के वाढ होऊन ९९३ लाख टन ऊस उपलब्ध होण्याची शक्यता आहे. हंगाम सुरू झाल्यापासून ६० दिवसांत डिसेंबरअखेर ४२८ लाख टन उसाचे गाळप झाले असून, ३८.२० लाख टन साखरनिर्मिती झाली आहे. अद्याप ५६५ लाख टन गाळप बाकी आहे. बिगरमोसमी पावसामुळे प्रतिहेक्टरी ऊसाच्या उत्पादनात ८ ते १० टक्के वाढ होईल, असे 'विस्मा'चे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी सांगितले. इथेनॉल निर्मितीस घातलेल्या बंदीचा पुनर्विचार करण्याची विनंती केंद्र सरकारला करणार असल्याचे त्यांनी सांगितले. डिसेंबरअखेर ४० टक्के ऊस गाळपातून ३८ लाख टन साखर उत्पादन झाले असल्याने उर्वरित ६० टक्के ऊस गाळपातून एकूण ९५ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज विस्माने वर्तविला आहे. हंगामाच्या सुरुवातीस महाराष्ट्रात ८८ लाख टन निव्वळ साखरेच्या उत्पादनाचा अंदाज साखर आयुक्तालय व साखर संघाने व्यक्त केला होता.महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटक व गुजरातमध्येही अवकाळी पाऊस झाल्याने त्याही राज्यांमध्ये ऊसाच्या प्रतिहेक्टरी उत्पादनात आठ ते १० टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. उत्तर प्रदेश, कर्नाटक व गुजरात या राज्यांत देशातील एकूण साखर उत्पादनापैकी ८० टक्के उत्पादन होते. देशांतर्गत वापरासाठी २७५ ते २८० लाख टन साखर लागते. या वर्षीचे अपेक्षित साखर उत्पादन ३२० लाख टन होणार असल्याने मुबलक साखर उपलब्ध होणार आहे.साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटर हवाई अंतराची अट रद्द करण्याची आग्रही मागणी मंगळवारी पुन्हा शेतकरी संघटनांनी साखर आयुक्तांकडे केली. या मागण्यांबाबतचा सविस्तर अहवाल साखर आयुक्त हे राज्य सरकारला सादर करणार आहेत, अशी माहिती साखर आयुक्तालयातून देण्यात आली. राज्य सरकारच्या आदेशानुसार मंगळवारी साखर आयुक्तालयात साखर आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि ऊस दर नियंत्रण मंडळाच्या सदस्यांची संयुक्त बैठक झाली.

### 'एफपीओ'ना परवानगी द्या

» मुक्त अर्थव्यवस्थेच्या काळात कारखान्यांवर हवाई अंतराची कोणतीही अट नको आहे. सर्वच कारखान्यांनी आपल्या गाळप क्षमतेत वाढ केली आहे, त्यामुळे उसाच्या उपलब्धतेचा प्रश्न येत नाही. २५ किलोमीटरच्या हवाई अंतराच्या नियमामुळे काही राजकीय नेत्यांची साखर उद्योगात मक्तेदारी निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या उसाला चांगला दर मिळण्यासाठी साखर उद्योगात खुली स्पर्धा निर्माण होण्याची गरज आहे. त्यामुळे हवाई अंतराची अट रद्द करावी, अशी आग्रही मागणी शेतकरी नेत्यांनी केली.हवाई अंतराची अट रद्द करून शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना (एफपीओ) साखर कारखाने सुरू करण्याची परवानगी द्यावी. खासगी उद्योजकांना कारखाना सुरू करण्याची परवानगी देऊ नका. पण, पाच ते सहा कुटुंबांच्या हातात गेलेला हा उद्योग सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलांसाठी खुला करावा.

# चिखली रामायण मैदानात होणार भजन महोत्सवाचा 'निनाद'!

## » राम मंदिर राष्ट्रार्पण निमित्त अध्यात्मिक उपक्रम : महेश लांडगे यांचा पुढाकार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू या तीर्थक्षेत्रांच्या सानिध्यात असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये भजन महोत्सवाचा 'निनाद' ऐकायला मिळणार आहे. वारकरी आणि अध्यात्मिक सांप्रदायाचा वारसा असलेल्या शहरामध्ये ही स्पर्धा भक्तीभय वातावरणात संपन्न होणार आहे.श्रीक्षेत्र अयोध्या येथे राम जन्मभूमी मंदिराचे उद्घाटन व प्राणप्रतिष्ठा दि. २२ जानेवारी २०२४ रोजी होत आहे. या निमित्त चिखली- जाधववाडी येथे भजन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.**




चिखली- जाधववाडी येथील रामायण मैदानावर दि. गुरूवार, दि.१८ जानेवारी ते शनिवार दि. २० जानेवारी २०२४ असे तीन दिवस भजन महोत्सव होणार आहेत. ह.भ.प. ज्ञानेश्वर मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा महोत्सव होणार असून, वारकरी आणि अध्यात्म क्षेत्रातील भाविक, नागरिकांसाठी पर्वणी ठरणार आहे. सुमारे १०० पेक्षा जास्त भजनी मंडळांचा सहभाग आहेत. त्यासाठी वारकरी क्षेत्रातील जाणकार ३ परीक्षक असतील. प्रत्येक भजनी मंडळाला १५ मिनिटे सादरीकरण करता येणार आहे. प्रत्येक भजनी मंडळात १० सदस्य संख्या, सांप्रदायिक क्षेत्रातील गवळणी व अभंग सादर होतील. भजनासाठी साहित्य स्पर्धक संघाला स्वत: आणावे लागेल. एकूण तीन दिवसांत रोज ३० भजनी मंडळांना महोत्सवात सहभागी होता येईल. सकाळ, दुपार आणि संध्याकाळ असे तीन सत्रामध्ये हा महोत्सव होणार आहे. तसेच, प्रत्येक सहभागी संघासाठी स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे, अशी माहिती ह.भ.प. काळुराम देवकर यांनी दिली. अधिक माहितीसाठी 9881780752 आणि 8788369468 यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

> “ प्रभू रामचंद्र यांचे जन्मभूमी मंदिर साकारले आहे. त्याची प्राणप्रतिष्ठा दि.२२ जानेवारी रोजी होत आहे. हा आपल्यासाठी ऐतिहासिक आणि मंगलमय क्षण आहे. प्रभू रामचरणी भजन सेवा व्हावा. या करिता भजन महोत्सव आयोजित केला आहे. या भक्तीमय सोहळ्याला पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित रहावे आणि भजन श्रवणाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करतो.
>
> - **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# महायुतीचा 'फॉर्म्यूला' ठरला!

## दिल्लीत वाटाघाटी : भाजपा- 32, शिवसेना- 10 अन् राष्ट्रवादीला 6 जागा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीची घोषणा कधी होणार याची देशात उत्सुकता लागून राहिली आहे. राज्यातही निवडणुकीचे पडसाद उमटायला लागले आहेत. भाजपकडून लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्रात सध्या भाजप-शिवसेना (शिंदे गट)- राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांचे सरकार आहे. लोकसभा निवडणुकीतही महायुती लढणार आहेत. त्यामुळं गेल्या काही दिवसांपासून जागावाटपाच्या चर्चांवरुन वातावरण तापलं होतं. मात्र, अखेर भाजपकडून जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे. भाजप राज्यात सर्वाधिक ३२ जागांवर लढणार आहे, अशी सूत्रांची माहिती आहे.**

सूत्रांनुसार, राज्यात भाजप ३२ जागांवर उमेदवार उभे करणार आहेत. अजित पवार गटाला ६ तर शिंदे गटाला १० जागांवर समाधान मानावे लागणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला १० जागा दिल्या जाणार असल्याची माहिती आहे. तर, राज्यात भाजप सर्वाधिक जागांवर उमेदवार उभे करणार आहेत. अजित पवार गटाला सातारा, रायगड, मावळ, बारामती, शिरूर, भंडारा गोंदिया मतदारसंघ मिळणार असल्याची माहिती समोर येतेय.

भाजप 32 जागांवर उमेदवार उभे करणार आहेत. लोकसभेसाठी



भाजप-राष्ट्रवादी-शिवसेना हे सूत्र ठरलं आहे. भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्याने महायुतीत भाजप मोठा भाऊ असणार स्पष्ट होतंय. मेरिटनुसार, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचे उमेदवार किती जागांवर निवडून येऊ शकतात याचा सर्व्हे करण्यात आला होता. त्यामुळं जे उमेदवार निवडून येऊ शकतात त्यांनाच तिकिट द्यायचे, असे ठरले आहे. या संदर्भात निश्चितातादेखील झाली आहे. त्याची आकडेवारीही भाजपकडे आहे. त्यामुळंच भाजप सर्वाधिक म्हणजेच 32 जागांवर उमेदवार उभे करणार असल्याची माहिती कळतेय.

मागच्या लोकसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना यांची युती होती. भाजपसोबत शिवसेना होती त्यामुळं जागावाटपाबाबत दोन्ही पक्षात चढाओढ पाहायला मिळाली होती. मागील लोकसभेला भाजपला 23 जागा मिळाल्या होत्या. मात्र, आता मागील निवडणुकीच्या तुलनेने 9 जागा अधिक भाजपच्या वाटेला आल्या आहेत.

एकनाथ शिंदे यांच्या गटाला 10 जागा मिळणार असल्याचे बोलले जाते. मात्र हे दहाही उमेदवार निश्चित निवडून येतील याची खात्री बाळगली जात आहे. जागावाटपाबाबत प्राथमिक स्तरावर बोलणी आहे.



### पुणे जिल्हा अजितदादांकडे

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्विवाद वर्चस्व असल्याने पुणे जिल्ह्यातील बारामती, शिरूर आणि मावळ या तीनही जागा राष्ट्रवादीला देण्यात आल्या. बारामतीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून सुप्रिया सुळे आणि शिरूरमधून डॉ. अमोल कोल्हे या दोन्ही विद्यमान खासदारांना पुन्हा उमेदवारी मिळणार असल्याने त्यांच्या विरोधात कोणाला संधी द्यायची यावर घोडं अडलयं. मावळात शिवसेना शिंदे गटाचे श्रीरंग बारणे यांना थेट प्रचाराला लागा असा संदेश मिळाल्याने त्यांनी दौरे सुरू केले. प्रत्यक्षात अजित पवार हे त्यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या २०१९ च्या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी मावळ लढण्यासाठी विशेष आग्रही असल्याचे समजले. मावळात पार्थ पवार हे उमेदवार झाले तर शिंदे गटाचे बारणे यांची अडचण होणार आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघातूनही डॉ. कोल्हे यांच्या विरोधात माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे शिंदे गटातून प्रबळ दावेदार आहेत. प्रत्यक्षात ही जागा अजित पवार यांच्या वाट्याला गेल्याने तिथे आढळराव यांना घड्याळ चिन्हा घेऊन लढावे लागणार अशी शक्यता आहे. शिरूर मध्ये पार्थ पवार यांचेही नाव चर्चेत आहे. तीनही लोकसभा मतदारसंघात अजित पवार यांच्या उमेदवारांना संधी दिली तर शिवसेना शिंदे गट नाराज होणार असल्याने महायुतीत संभ्रम आहे.

---

# मावळात आता नव्या चेहऱ्याला संधी!

## सचिन आहेर यांचा दावा : शिवसेना ठाकरे गटाचाच खासदार होणार!

। मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज

**"मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पहिले जाहीर करावं की ते नेमकं कोणत्या चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत. गजानन बाबर यांची समजूत घालून नवीन चेहऱ्याला संधी मिळावी म्हणून बारणेंना संधी दिली गेली होती. मात्र आता मावळ लोकसभेसाठी स्थानिक लोकांचा विचार करणारा, शहरीकरणाला सामोरे जाऊ शकतो, असा उमेदवार दिला जाईल. उमेदवार दिल्यानंतर जनता जुन्या चेहरा बाजूला ठेवून नवीन चेहऱ्याला संधी देतील," असा दावा ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी केला. 'मावळ लोकसभेवर पुन्हा शिवसेना ठाकरे गटाचाच खासदार होणार,' असा विश्वास सचिन अहिर यांनी व्यक्त केला..**




'संजोग वाघेरे यांना पक्षाने जिल्हा संघटक मावळ लोकसभेची जबाबदारी दिली आहे. या पूर्ण भागाची संघटन जबाबदारी दिलेली आहे. कमी वेळात त्यांनी जनसंपर्क वाढवून पक्ष वाढीचे काम सुरू केले आहे. सर्वसामान्य लोकांचे प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरताना पाहायला मिळत आहेत. त्यांच्याबद्दलची एक आपुलकी वाढू लागली आहे. मात्र उमेदवारी बाबतचा निर्णय हा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे घेतील,' असे अहिर यांनी नमूद केले. ते लोणावळ्यात मावळ लोकसभा पूर्वतयारी बैठकीत बोलत होते.

भाजपचे नेते, मंत्री गिरीश महाजन यांच्यावर अहिर यांनी टिका केली. 'गिरीश महाजन यांनी त्यांच्या मतदार संघात खासदार निवडून येईल की नाही याच्याकडे लक्ष द्यावे. मावळ लोकसभा ही पारंपरिक दृष्टिकोनातून शिवसेनेकडे असलेली लोकसभा आहे. आम्हाला खात्री आहे की रायगड मधील विधानसभा मधून मिळणारी आघाडी ही यावेळी पिंपरी चिंचवड आणि मावळ विधानसभेमधून देखील मिळेल, असा विश्वास आहे. विशेषता मावळमध्ये पण एक मोठ्या प्रमाणावर शिवसेनेला मानणारे नागरिक आहेत. त्यामुळे यावेळी देखील शिवसेना ठाकरे गटाचा खासदार मावळ लोकसभेवर निवडून येईल, असा विश्वास शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी लोणावळ्यात व्यक्त केला. मावळ लोकसभा पूर्वतयारी बैठकीत ते बोलत होते.,


### 'मातोश्री'ला टार्गेट केलं जातेय

» **उद्धव ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या'मातोश्री'वर घातपाताची शक्यता पोलिसांनी वर्तवली होती, यावर अहिर म्हणाले, 'तुम्ही कोणाबद्दल बोलावं आणि किती बोलावं यालाही मर्यादा आहे. 'मातोश्री'ला टार्गेट केलं जातं. काही तपास यंत्रणाच्या माध्यमातून रिपोर्ट येत असतात. त्यामुळे कुणी काय बोलावे, यावर मर्यादा असाव्यात, असे मत ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी व्यक्त केले.**




# ‘नेहरूवादा’ऐवजी आता कल्याणवाद!

**लोकशाहीमध्ये राष्ट्राच्या विकासात्मक उद्दिष्टांशी जुळवून घेणारी धोरणे आखणाऱ्या राजकीय विचारधारांनाच अखेर लोकांकडून पाठिंबा मिळतो. त्यामुळे ‘नेहरूवादी’ समाजवादापासून ते स्पर्धात्मक कल्याणवादात झालेले परिवर्तन हे भारताच्या वैविध्यपूर्ण लोकसंख्येच्या विकसित आकांक्षा आणि गरजांशी अनुकूलता दर्शवणारेच आहे आणि ते प्रत्येक निवडणुकीत सिद्ध होते आहे!**



भारतीय राजकारणात अलीकडे झालेला मोठा वैचारिक बदल म्हणजे कल्याणकारी योजनांवर भर देण्यात आला असूनही, आर्थिक वाढीकडे- उद्योगांच्या भरभराटीकडे पुरेसे लक्ष दिले जाते आहे. याला ‘स्पर्धात्मक कल्याणवाद’ असे म्हणता येईल आणि त्याचा निवडणूक निकालांवरही लक्षणीय परिणाम झाला आहे. भारत जसजसा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीकडे वाटचाल करत आहे, तसतसे नेहरूवादी समाजवादाचे अपयश आणि ‘स्पर्धात्मक कल्याणवादा’चे यश अधिकच स्पष्ट होते आहे. आर्थिक विचारसरणीत होत असलेला हा बदल भारताच्या राजकीय पटलावरील सखोल परिवर्तनाचा द्योतक ठरला आहे. हा बदल केवळ देशाच्या आर्थिक धोरणांमधील महत्त्वपूर्ण उत्क्रांती दर्शवत नाही तर त्याच्या मतदारांच्या उत्क्रांत होणाऱ्या प्राधान्यक्रम आणि आकांक्षांचे प्रमुख सूचक म्हणूनही काम करतो. हा वैचारिक बदल जागतिक आर्थिक आणि राजकीय गतिमानतेमध्ये खोलवर गुंफलेले आहेत, त्यामुळेच आगामी निवडणुकीतील लढत कशी असेल याचा अंदाज येण्यासाठी आणि जगातील सर्वात मोठया लोकशाहींपैकी एक असलेल्या भारतातील मतदारांच्या पसंतींचे बदलते रूप समजून घेण्यासाठी या बदलांकडे पाहिले पाहिजे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली समाजवाद-प्रणीत आर्थिक प्रारूप स्वीकारले. म्हणजेच सरकारच्या नेतृत्वाखालील औद्योगिकीकरण, केंद्रीय नियोजन आणि मिश्र अर्थव्यवस्थेवर भर दिला. नवीन राष्ट्रात उच्चभ्रूंची नवी फळी निर्माण करण्यासाठी जलद औद्योगिकीकरण आणि लायसन्स राजद्वारे नियंत्रित असे मजबूत सार्वजनिक क्षेत्र आवश्यक आहे, असा नेहरूंचा विश्वास हे प्रारूप स्वीकारण्यामागे असावा. हेतू चांगले असूनही, नेहरूंच्या योजनेचा भारताच्या आर्थिक विकासावर आणि सामाजिक कल्याणावर विपरीत परिणाम झाला. सरकारचा हस्तक्षेप, लायसन्स राज आणि अवजड उद्योगांवर भर या साऱ्याच्या परिणामी आर्थिक वृद्धीचा दर (सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या म्हणजेच ‘जीडीपी’च्या वाढीचा दर) या सर्व काळात दरवर्षी सरासरी २.१ टक्के इतकाच राहिला. भारतात दारिद्र्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली, मोठया प्रमाणावर निरक्षरता आणि कुपोषण वाढले. या प्रारूपाने कृषी आणि लघु उद्योगांकडे दुर्लक्ष केले, त्यामुळे आर्थिक विकासाचा समतोल ढासळला. प्रमुख क्षेत्रांवर राज्य यंत्रणेच्या नियंत्रणामुळे नवकल्पना थांबली. नेहरूवादावरच पुढेही भर राहिल्यामुळे जागतिक व्यापार आणि उत्पादनातील संधी भारताने गमावल्या. त्यामुळे भारताला एक महत्त्वपूर्ण जागतिक आर्थिक शक्ती बनणे या काळात अशक्यच ठरले, उलट देशामध्ये आर्थिक विषमता, भ्रष्टाचार बोकाळले. धोरणातील या अपयशामुळे भारताच्या प्रगतीला आणखी अडथळा निर्माण झाला. थोडक्यात, नेहरूवादी समाजवाद हा भारताच्या यश आणि समृद्धीमध्ये एक मोठा अडथळा ठरला होता. त्यामुळेच विविध क्षेत्रांमध्ये आपल्या देशाची क्षमता मर्यादित होती आणि त्यामुळे सामाजिक आव्हानेदेखील वाढत होती.नेहरूवादी समाजवादाने भारताची आर्थिक वाढ कुंठित केली, देश जवळपास डबघाईला येण्याकडे वाटचाल करू लागला. त्यामुळेच भारतीय रिझर्व्ह बँकेला अर्थव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी बँक ऑफ इंग्लंड आणि बँक ऑफ जपानकडे ४६.९१ टन सोने गहाण ठेवावे लागले, या घडामोडी १९८० च्या दशकाच्या अखेरीस घडत होत्या. त्यातून बाहेर पडण्यासाठी १९९१ पासून आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारावेच लागणार होते कारण अर्थसंकल्पात वाढती तूट, परकी चलनाची गंगाजळी आटलेली आणि जग तर पुढे चाललेले अशी स्थिती त्या वेळी होती.

## संपादकीय »

### जुनेच आक्रंदन

***राज्यात मराठी पाट्या हव्यातच. पण प्रतिभेची उडी पाट्यांच्या पलीकडेही जायला हवी ना.***

मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी साहित्य, मराठी माध्यमातून द्यावयाचे शिक्षण आणि मराठी समाजाचा देशात किंवा जगात निर्माण करावयाचा चौफेर दीर्घकालीन प्रभाव.. या साऱ्यांविषयी जागरूक राहून, दूरदृष्टीने प्रयत्न करणारे राज्यकर्ते महाराष्ट्राला आजवर अपवाद वगळता मिळालेले नाहीत. नजीकच्या भविष्यात मिळण्याची शक्यताही दिसत नाही. मुंबईतील महापालिकेच्या अनेक मराठी माध्यमाच्या ‘शून्य पटसंख्या’ असल्याने बंद होणे आणि दुसरीकडे, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून उच्च शिक्षणासाठी मराठी माध्यमाचा वापर करण्यात अनुत्साह असणे.. या दोन्ही एकाच साखळीतील घटना आहेत. राज्य सरकारला केवळ ‘विश्व मराठी संमेलना’च्या नावाखाली डामडौल, पैशाची नाहक उधळपट्टी आणि अत्यंत जुजबी कार्यक्रम आयोजित करण्यातच रस आहे. मराठी भाषा आणि एकूण मराठी भाषिक लोकव्यवहार आणि अस्सल मराठी संस्कृती यांचे नवसर्जन व्हावे.

**यंदाच्या वर्षांत ज्या मोजक्या सार्वत्रिक निवडणुकांकडे जगाचे लक्ष लागलेले आहे, त्यांतील एक – तैवानचे अध्यक्ष व कायदेमंडळाची निवडणूक – नुकतीच पार पडली. अजस्र चीनच्या बाजूला वसलेला तैवान हा भलताच चिमुकला देश. पण स्वत:ची स्वायत्तता प्राणपणाने जपणारा.**

# तैवानचा आश्वासक कौल

हाँगकाँग, मकावपाठोपाठ तैवानलाही ‘चीनचा अविभाज्य भाग’ बनवण्याची चिनी राज्यकर्त्यांची आकांक्षा तशी जुनीच. पण क्षी जिनपिंग यांच्या अमदानीत तिला नवे धारदार धुमारे फुटले आहेत.चीनच्या नवविस्तारवादी धोरणामध्ये तैवानवर कब्जा करणे हे प्राधान्याने येते. तैवानला ‘वाचवण्या’चा वसा अमेरिकेने घेतल्यामुळे चीन अधिक बिथरला आहे. जगात सध्या दोन प्रमुख संघर्षबिंदू येतात- युक्रेन आणि पश्चिम आशिया. परंतु तैवानच्या निमित्ताने पूर्व आशियात तिसरा संघर्षबिंदू उद्भवल्यास तो युक्रेन-रशिया आणि इस्रायल-हमासपेक्षा कितीतरी अधिक संहारक ठरेल. कारण या संघर्षामध्ये अमेरिका आणि चीन या दोन महासत्ता परस्परांना थेट भिडण्याची शक्यता खूपच अधिक आहे. या पार्श्वभूमीवर तैवानमधील सार्वत्रिक निवडणुकांच्या निकालाकडे पाहावे लागेल.सत्तारूढ डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पक्षाचे (डीपीपी) उमेदवार आणि विद्यमान उपाध्यक्ष विल्यम



लाय चिंग- ते अध्यक्षीय निवडणुकीत विजयी झाले. डीपीपी हा पक्ष चीनच्या राज्यकर्त्यांना खुपतो, कारण तैवान हा स्वतंत्र, सार्वभौम देश असल्याची डीपीपीची भूमिका आहे. तर तैवान हा चीनचा सार्वभौम भाग असल्याची चीनची सुरुवातीपासूनची भूमिका आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीआधी तैवानच्या मतदारांना हरतऱ्हेने प्रभावित करण्याचा प्रयत्न चीनने करून पाहिला. या निवडणुकीचा कौल म्हणजे शांतता किंवा युद्ध, समृद्धी किंवा ऱ्हास यांपैकी एकाची निवड करण्याचा क्षण असल्याची धमकी चीनने रेटून पाहिली. पण या दडपणाला बळी न पडता, तैवानवासीयांनी पुन्हा एकदा डीपीपीची निवड केली. सलग तिसऱ्यांदा हा पक्ष अध्यक्षीय निवडणुकीत विजयी ठरला असून, तैवानच्या इतिहासात असे प्रथमच घडले. अर्थात हे यश निर्भेळ नाही. कारण कायदेमंडळाच्या निवडणुकीत डीपीपीच्या तुलनेत चायनीज नॅशनलिस्ट पार्टी किंवा कुओमिन्तांग (केएमटी) या पक्षाला अधिक जागा मिळाल्या. हा पक्ष चीनशी जुळवून घेण्यास प्राधान्य देतो.

अशा प्रकारे अध्यक्ष एका पक्षाचा पण कायदेमंडळात बहुमत विरोधी पक्षाचे, अशी रचना झाल्यामुळे तैवानमध्ये राजकीय अस्थैर्य निर्माण होऊ शकते. याचा फायदा घेण्याचा प्रयत्न चीनकडून होणारच. चीनमधील कम्युनिस्ट पक्षाच्या तैवानविषयक प्रवक्त्याने ‘डीपीपी मुख्य प्रवाहातील जनतेचे प्रतिनिधित्व करत नाही आणि राष्ट्रीय एकीकरणाचे चीनचे उद्दिष्ट कायम राहील’, अशी मोघम प्रतिक्रिया दिली. चीनच्या धमक्यांना बधून डीपीपीपेक्षा केएमटीच्या उमेदवाराची अध्यक्षपदी निवड होईल, अशी चीनची अटकळ होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गोगावलेंची प्रतोदपदी नियुक्ती बेकायदेशीर?

## सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा अवमान केला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी खरी शिवसेना कोणाची आणि आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल दिला. तसेच त्यांनी शिवसेनेच्या प्रतोदपदाबाबतही निर्णय दिला. नार्वेकर यांनी एकनाथ शिंदेंच्या गटाला खरी शिवसेना म्हणून मान्यता दिली आणि दोन्ही गटातील आमदारांना पात्र ठरवलं आहे. तसेच आमदार भरत गोगावले यांची शिंदे गटाच्या प्रतोदपदी करण्यात आलेल्या नियुक्तीला मान्यता दिली आहे.**



परंतु, ठाकरे गटाने दावा केला आहे की, गोगावले यांची पक्षाच्या विधीमंडळ प्रतोदपदी केलेली नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरवली होती. परंतु, नार्वेकरांनी त्या नियुक्तीला मान्यता देत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा अवमान केला आहे. तसेच या निकालाविरोधात ठाकरे गटाने आज महापत्रकार परिषद बोलावून नार्वेकरांवर हल्लाबोल केला.ठाकरे गटाच्या पत्रकार परिषदेनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीदेखील पत्रकार परिषद घेऊन ठाकरे गटाच्या आरोपांना उत्तर दिलं आहे. राहुल नार्वेकर म्हणाले, ठाकरे गटाने सातत्याने सर्वांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे की, विधानसभा अध्यक्षांनी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचं पालन केलेलं नाही. न्यायालयाने ठरवून दिलेल्या चौकटीच्या बाहेर जाऊन निकाल दिला, आपल्या मनाने निर्णय घेतले. परंतु, मी कोणत्या चौकटीबाहेर जाऊन निकाल दिला हे मात्र त्यांनी सांगितलं नाही.राहुल नार्वेकर म्हणाले, भरत गोगावलेंच्या नियुक्तीला मान्यता देण्याच्या निकालावर त्यांनी आरोप केला. विधानसभा उपाध्यक्षांनी २१ जून २०२२ रोजी अजय चौधरी यांच्या निवडीला दिलेली मान्यता योग्य आहे. त्याचबरोबर विधानसभा अध्यक्षांनी म्हणजेच मी ३ जुलै २०२२ रोजी भरत गोगावले आणि एकनाथ शिंदे यांच्या नियुक्तीला दिलेली मान्यता चुकीची आहे, असं सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या निकालात म्हटल्याचा दाखला ठाकरे गट देत आहे. परंतु,हे सत्य नाही. अर्धसत्य हे असत्यापेक्षा घातक असतं. तोच प्रकार या निकालाच्या बाबतीत झाला आहे.विधानसभा अध्यक्ष म्हणाले, तुम्ही सर्वांनी सर्वोच्च न्यालयाचा निकाल वाचायला हवा. त्यामधील पृष्ठ क्रमांक ९७ आणि १२२ वा परिच्छेद, पृष्ठ क्रमांक ८५ आणि १२४ वा परिच्छेद, पृष्ठ क्रमांक ९७ आणि १२४ वा परिच्छेद, पृष्ठ क्रमांक १३९ आणि २०६ वा परिच्छेद काळजीपूर्वक वाचायला हवेत. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे की, ज्यावेळी आपल्याला एखाद्या प्रतोदाला मान्यता द्यायची असते किंवा गटनेत्याला मान्यता द्यायची असते, तेव्हा अध्यक्षांनी तो निर्णय राजकीय पक्षाची भूमिका समजून आणि त्यांची त्यासंदर्भातली इच्छा समजून घ्यायला हवी. २१ जून २०२२ रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या उपाध्यक्षांनी आमदार अजय चौधरी यांची प्रतोदपदी आणि आमदार सुनील प्रभू यांच्या गटनेतेपदी करण्यात आलेल्या नियुक्तीला मान्यता दिली होती. तेव्हा त्यांच्यासमोर केवळ उद्धव ठाकरे यांचं एकच पत्र होतं. त्यामुळे विधीमंडळ गटाच्या राजकीय पक्षात फूट पडली आहे हे उपाध्यक्षांना समजण्याचं कारणच नव्हतं. तसेच त्यांच्या रेकॉर्डवर असा कोणताही पुरावा नव्हता. त्यामुळे उद्धव ठाकरेंनी पाठवलेलं पत्र ही राजकीय पक्षाची भूमिका आहे असं ग्राह्य धरून उपाध्यक्षांनी तो निर्णय दिला होता.

### पक्ष ठरवावा आणि मगच प्रतोद

» परंतु, अध्यक्षांनी म्हणजेच मी ३ जुलै रोजी जो निर्णय दिला. तेव्हा माझ्यासमोर दोन राजकीय पक्षांचे दावे होते. ठाकरे गट आणि शिंदे गटाने त्या पदांवर दावा केला होता. याचा अर्थ अध्यक्षांना याची कल्पना होती की पक्षात दोन गट पडले आहेत. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १० जानेवारी रोजी खरी शिवसेना कोणाची आणि आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल दिला. तसेच त्यांनी शिवसेनेच्या प्रतोदपदाबाबतही निर्णय दिला. नार्वेकर यांनी एकनाथ शिंदेंच्या गटाला खरी शिवसेना म्हणून मान्यता दिली आणि दोन्ही गटातील आमदारांना पात्र ठरवलं आहे. तसेच आमदार भरत गोगावले यांची शिंदे गटाच्या प्रतोदपदी करण्यात आलेल्या नियुक्तीला मान्यता दिली आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांनी म्हणजेच मी प्रतोद आणि गटनेत्याला मान्यता देण्याचा निर्णय घेताना कोणता गट मूळ राजकीय पक्ष आहे हे ठरवणं गरजेचं आहे. त्यावेळी मी राजकीय पक्ष न ठरवता निर्णय दिला होता त्यामुळे तो निर्णय अयोग्य ठरवण्यात आला होता. परंतु, यावेळी सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना म्हणजेच मला आदेश दिले होते की, आधी मूळ राजकीय पक्ष ठरवावा आणि मगच प्रतोद, गटनेत्याच्या नियुक्तीला मान्यता द्यावी.

# मनोज जरांगे पाटील मुंबईतील आंदोलनावर ठाम!

## आरक्षण मिळालं तर गुलाल घेऊन मुंबईला जाऊ : जरांगे पाटील

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्या 54 लाख कुणबी नोंदी (KUNBI CERTIFICATE) सापडल्या आहेत त्यांना 20 जानेवारीपर्यंत प्रमाणपत्र द्या, आरक्षण (MARATHA RESERVATION) मिळालं तर गुलाल घेऊन मुंबईला जाऊ आणि नाही मिळालं तर ते घेण्यासाठी मुंबईला जाऊ असं सांगत आपल्या मुंबईच्या आंदोलनावर ठाम असल्याचं मनोज जरांगे (MANOJ JARANGE) यांनी स्पष्ट केलं आहे.**

तर नोंदी मिळालेल्यांच्या सग्यासोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळणार असल्याचं आश्वासन राज्य सरकारने दिलं आहे. आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने मनोज जरांगे यांची भेट घेतली आणि त्यांना मराठा आरक्षणाचा नवीन मसूदा दिला. **आमदार बच्चू कडू (BACHCHU KADU) आणि मुख्यमंत्र्यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी मनोज जरांगेंची भेट** घेत त्यांना मराठा आरक्षणाचा नवा ड्राफ्ट सादर केला आहे. नव्या ड्राफ्टनुसार कुणबी नोंदी आढळलेल्या रक्ताच्या नात्यातील सग्यासोयऱ्यांना तसंच



इतर मागासवर्गीयांना कुणबी प्रमाणपत्र मिळणार असल्याचं आश्वासन सरकारकडून देण्यात आलंय. तर सरकारने दिलेल्या मसुद्याचा अभ्यास करु असं मनोज जरांगे यांनी सांगितलं. तसंच 54 लाख नोंदी मिळालेल्या सग्यासोयऱ्यांनाही प्रमाणपत्र दिले तर गुलाल घेऊन मुंबईला जाऊ अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी दिलं आहे. त्यामुळे मनोज जरांगे आपल्या मुंबई दौऱ्यावर ठाम आहेत हे स्पष्ट झालंय. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांनी येत्या 22 जानेवारीपासून मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यासाठी त्यांचे नियोजनही सुरू झालं आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीमध्ये समावेश करावं ही त्यांची प्रमुख मागणी आहे. मराठा आरक्षणासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असून त्यासाठी फेब्रुवारीमध्ये विशेष अधिवेशन घेणार असल्याचं या आधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलं आहे.

### नवीन मसूदा जरांगेंना दिला

» बच्चू कडू यांच्याकडून एक अधिसूचनेचा मसूदा मनोज जरांगे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. आता जरांगे त्यांच्याकडून त्यावर अभ्यास करण्यात येणार आहे. या सर्व बाबी वेळेत करता आल्या असत्या असं म्हणत ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत कुणबी नोंदी आढळलेल्या रक्त संबंधांतील सोयऱ्यांना, स्व जातीतील विवाह झालेल्या सग्या-सोयऱ्यांना भटक्या,अनुसूचित जाती जमाती तसेच इतर मागासवर्गीयांना कुणबी प्रमाणपत्र मिळणार असल्याची माहिती आहे.

# आंध्र प्रदेशात भाऊ विरुद्ध बहीण सामना

## » मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्यासमोर मोठं आव्हान

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री वाय. एस. जगन मोहन रेड्डी यांची मोठी बहीणी वाय. एस. शर्मिला यांनी अलीकडेच त्यांचा वायएसआर तेलंगणा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला आणि त्यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खासदार राहुल गांधींच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर शर्मिला यांनी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यासमोर मोठं आव्हान उभं केलं आहे. कारण काँग्रेसने शर्मिला यांना आंध्र प्रदेश काँग्रेसचा चेहरा बनवलं आहे. काँग्रेसने शर्मिला यांची पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. काँग्रेस पक्ष आंध्र प्रदेशची आगामी विधानसभा निवडणूक शर्मिला यांच्या नेतृत्वात लढणार आहे. त्यामुळे विद्यमान मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्यासमोर मोठं आव्हान निर्माण झालं आहे.**

आंध्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गिडुगू रुद्र राजू यांनी सोमवारी (१५ जानेवारी) आपल्या पदाचा राजीनामा दिला. पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे आपला राजीनामा सुपूर्द करून राजू प्रदेशाध्यक्षपदावरून पायउतार झाले आहेत. त्यानंतर पक्षाने वाय. एस. शर्मिला यांची काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. त्यांनी ४ जानेवारी रोजी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. याआधी त्यांनी तेलंगणाच्या विधानसभा निवडणुकीत स्वतःच्या पक्षाचे उमेदवार उभे न करता काँग्रेसला पाठिंबा दिला होता. त्यानंतर त्यांनी थेट काँग्रेसमध्ये प्रवेश केला. शर्मिला या आंध्र प्रदेशचे दिवंगत नेते तथा माजी मुख्यमंत्री वाय. एस. राजशेखर रेड्डी यांच्या कन्या आहेत. काँग्रेस पक्षप्रवेशाच्या वेळी शर्मिला म्हणाल्या होत्या की, पक्ष त्यांना जी जबाबदारी देईल ती पेलण्यास त्या समर्थ आहेत. शर्मिला म्हणाल्या होत्या, मी पक्षात कोणतीही जबाबदारी स्वीकारण्यास तयार आहे. केवळ आंध्र प्रदेशच नव्हे तर आंदमानमध्येही मी पक्षाची जबाबदारी घेण्यास तयार आहे.




मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी काँग्रेस सोडून वायएसआर काँग्रेसची स्थापना केली तेव्हा त्यांची बहीण वायएस शर्मिला यांनी त्यांना साथ दिली होती.

परंतु, बेहिशेबी मालमत्तेप्रकरणी जगनमोहन रेड्डी यांना अटक झाल्यावर पक्षाची सूत्रे शर्मिला यांनी आपल्या हाती घेतली. भावाला अटक झाल्यावर शर्मिला यांनी आंध्र प्रदेशमध्ये पदयात्रा काढून वायएसआर काँग्रेससाठी अनुकूल वातावरणनिर्मिती केली होती. त्यामुळेच २०१९ च्या आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीत जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआर काँग्रेसला बहुमत मिळालं आणि जगनमोहन रेड्डी मुख्यमंत्री झाले. परंतु, त्यानंतरच्या काळात जगनमोहन रेड्डी आणि शर्मिला यांच्यात दुरावा निर्माण झाला. शर्मिला यांनी नंतर वायएसआर तेलंगणा काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्यामुळे जगनमोहन आंध्र प्रदेश तर शर्मिला तेलंगणात आपले वर्चस्व निर्माण करतील अशी शक्यता वर्तवली जात होती. परंतु, शर्मिला यांना तेलंगणात फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा आंध्र प्रदेशकडे मोर्चा वळवला आणि काँग्रेसबरोबर जाण्याचा निर्णय घेतला. अलीकडेच नवी दिल्लीत काँग्रेस नेत्यांची भेट घेतल्यावर शर्मिला यांनी त्यांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला होता.आंध्र प्रदेश काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी माजी मुख्यमंत्री वाय. एस. राजशेखर रेड्डी यांची कन्या वाय. एस. शर्मिला यांची नियुक्ती करण्यात आल्याने आगामी विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री जगनमोहनरेड्डी विरुद्ध त्यांची बहीण शर्मिला यांच्यात सामना होणार आहे. काँग्रेसला सत्ता मिळाल्यास शर्मिला हा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असेल, असेच संकेत आहेत. मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी काँग्रेस सोडल्यावर वायएसआर काँग्रेसची स्थापना केली तेव्हा त्यांची बहीण शर्मिला यांनी त्यांना साथ दिली होती.बेहिशेबी मालमत्ता प्रकरणी जगनमोहन यांना अटक झाल्यावर पक्षाची सूत्रे शर्मिला यांनी हाती घेतली होती. भावाला अटक झाल्यावर बहीण शर्मिला यांनी आंध्रमध्ये पदयात्रा काढून वातावरणनिर्मिती केली होती. २०१९च्या निवडणुकीत जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआर काँग्रेसला बहुमत मिळाले. जगनमोहन रेड्डी मुख्यमंत्री झाल्यावर त्यांच्यात व बहीण शर्मिला यांच्यात दुरावा निर्माण झाला. जगनमोहन आंध्र तर शर्मिला तेलंगणात आपले वर्चस्व निर्माण करतील अशी शक्यता वर्तविली जात होती.

### जनसेना पार्टी यांच्या युतीचे आव्हान

» माजी मुख्यमंत्री वाय. एस. राजशेखर रेड्डी यांची पुण्याई अजूनही कायम आहे. जगनमोहन रेड्डी सरकारच्या कार्यपद्धतीबद्दल लोकांमध्ये नाराजी आहे. याचाच फायदा उठविण्याकरिता काँग्रेस पक्षाने वाय. एस. राजशेखर रेड्डी यांची कन्या शर्मिला यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. भाजपही रिंगणात असला तरी आंध्रमध्ये भाजपची फारशी पाळेमुळे रोवली गेलेली नाहीत. यंदा चंद्राबाबू नायडू यांचा तेलुगू देशम आणि चित्रपट सूपरस्टार पवन कल्याण यांच्या जनसेना पार्टी यांच्या युतीचे आव्हान आहे.

# ‘आप, उबाठा गट RSS चे छोटा रिचार्ज

## » राम मंदिर कार्यक्रमांवर ओवेसींची टीका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन या राजकीय पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी राम मंदिर लोकार्पणावरून इंडिया आघाडीतील घटक पक्षांवर जोरदार टीका केली आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीच्या सर्व विधानसभा मतदारसंघात सुंदरकांड पाठाचे करण्याचे आयोजन केले आहे.**

राम मंदिर प्राणप्रतिष्ठेनिमित्त सदर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. ‘आप’चे सर्व नेते या धार्मिक कार्यक्रमात सामील होणार आहेत. ‘आप’च्या निर्णयावर आता ओवेसी यांनी टीका केली आहे.



तसेच त्यांनी ठाकरे गटावरही शरसंधान साधले आहे.पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना ओवेसी म्हणाले, “तुमच्यात (‘आप’ आणि इतर पक्ष) भाजपा-आरएसएसमध्ये काय फरक आहे. या पक्षातील कुणी नेते म्हणतात, शरयू नदीवर जाणार, कुणी राष्ट्रपतींना नाशिकमधील काळाराम मंदिरात बोलवत आहे, इथे दिल्लीत ‘आप’तर्फे सूरजकांड आणि हनुमान चालीसाचे पठन केले जाणार आहे. त्यामुळे यांच्यात आणि भाजपाच्या विचारधारेत कोणताही फरक दिसत नाही. मग तुम्ही मोदींना कसे हरविणार? मला वाटतं विरोधकांचा हा दुटप्पीपणा आहे.”शिवसेना उद्धव ठाकरे गटाने २२ जानेवारी रोजी नाशिकच्या काळाराम मंदिरात पूजेचे आयोजन केले आहे. यासाठी उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनाही निमंत्रण दिले आहे. अयोध्येतील राम मंदिराच्या भूमिपूजनाला आणि संसदेच्या नव्या इमारतीचे उदघाटन करताना राष्ट्रपतींना बोलावले गेले नव्हते. त्यामुळे ठाकरे गटाने काळाराम मंदिरात पूजा करण्याचे निमंत्रण राष्ट्रपतींना पाठविले. मात्र यावर ओवेसींनी टीका केली. “आता हिंदुत्वाचे स्पर्धात्मक राजकारण होताना दिसत आहे. बहुसंख्या मतदारांचे अधिकाधिक मतं कशी मिळवता येतील, याचा प्रयत्न होताना दिसत आहे. तसेच ओवेसी यांनी स्वतःच्या एक्स अकाऊंटवर पोस्ट टाकत ‘आप’ पक्षाला RSS चा छोटा रिचार्ज असल्याचे म्हटले. ‘आप’ने २२ जानेवारी रोजीच्या कार्यक्रमानिमित्त दिल्लीतील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सुंदरकांड पाठ पठण करण्याचे आयोजन केले आहे. मी हे आठवण करून देऊ इच्छितो की, हे पक्ष ब्लिकिस बानो प्रकरणावर मौन बाळगून होते.

# कूनो अभयारण्यात ‘शौर्य’चा मृत्यू!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

मध्य प्रदेशातली कूनो राष्ट्रीय अभयारण्यात आणखी एका चित्त्याचा मृत्यू झाला. हा चित्ता नामबियातून आणण्यात आला होता. त्याचं नाव शौर्य असं ठेवण्यात आलं होतं. शौर्य हा नामिबीयातून आणलेला दहावा चित्ता होता. कूनो या अभय अरण्यात मृत्यू झालेल्या चित्त्यांची संख्या आता दहा झाली आहे. सिंह प्रकल्पाच्या संचालकांनी एक पत्रक जारी केलं आहे. त्यात हे नमूद करण्यात आलं आहे की १६ जानेवारी या दिवशी दुपारी ३.१७ च्या दरम्यान शौर्य या चित्त्याचा मृत्यू झाला. मृत्यूचं कारण शवविच्छेदनानंतर कळणार आहे असंही सांगण्यात आलं आहे. हा चित्ता जंगलात बेशुद्ध अवस्थेत आढळला होता. त्याच्यावर उपचार सुरु होते. साशा’ या मादी चित्त्याचा २७ मार्चला मूत्रपिंडाच्या आजाराने, तर ‘उदय’ या चित्त्याचा १३ एप्रिलला हृदय निकामी झाल्यामुळे आणि ‘दक्षा’ या मादीचा ९ मे रोजी चित्त्यांच्या झुजींनंतर मृत्यू झाला. त्यानंतर ११ जुलैला ‘तेजस’, १४ जुलैला ‘सूरज’ तर दोन ऑगस्टला ‘धात्री’ या मादी चित्त्याचा मृत्यू झाला. भारतात चित्ते आल्यानंतर त्यातील एका मादी चित्त्याने २४ मार्चला चार बछड्यांना जन्म दिला. मात्र, २३ मे रोजी एक तर २५ मे रोजी दोन बछड्यांचा मृत्यू झाला. तसंच आज ‘शौर्य’ या चित्त्याचा मृत्यू झाला त्याचे फोटो सोशल मीडियावरही पोस्ट करण्यात आले होते. वन विभागाने याविषयी आनंद व्यक्त केला होता.

# 'मैं अटल हूं' चा अंगावर शहारे आणणारा ट्रेलर रिलीज!

अभिनेते पंकज त्रिपाठी (PANKAJ TRIPATHI) यांचा मोस्ट अवेटेड चित्रपट 'मैं अटल हूं' (MAIN ATAL HOON) या चित्रपटाचा दुसरा ट्रेलर रिलीज झाला आहे. या चित्रपटात पंकज त्रिपाठी यांनी देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी (ATAL BIHARI VAJPAYEE) यांची भूमिका साकारली आहे. 'मैं अटल हूं' या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी रिलीज झाला. या ट्रेलरला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. आता या चित्रपटाचा आणखी एक ट्रेलर रिलीज करण्यात आला आहे. या ट्रेलरमध्ये इतिहासातील विविध घटना दाखवण्यात आल्या आहेत. 'मैं अटल हूं' या चित्रपटाच्या दुसऱ्या ट्रेलरमध्ये भारतीय इतिहासातील विविध घटना दाखवण्यात आल्या आहेत. यामध्ये महात्मा गांधींची हत्या, अटल बिहारी वाजपेयी यांचा राजकीय संघर्ष, आणीबाणी , रामजन्मभूमी, पोखरण अणुचाचणी आणि कारगिल युद्ध या घटनांची झलक दाखवण्यात आली आहे. ट्रेलरमधील पंकज त्रिपाठी यांच्या अभिनयानं अनेकांचे लक्ष वेधले आहे.'मैं अटल हूं' या चित्रपटाच्या पहिल्या ट्रेलर लॉन्चच्या कार्यक्रमामध्ये पंकज त्रिपाठी यांनी सांगितलं की, अटल बिहारी वाजपेयी यांची भूमिका साकारणे हे त्यांच्यासाठी कठीण काम होते. "अटलजींची व्यक्तिरेखा साकारताना मला त्यांची नक्कल करायची नव्हती. मला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची कॉपी करायची नाही.", असेही पंकज यांनी सांगितलं. "मी मैं अटल हूं या चित्रपटाचे 60 दिवस शूटिंग केले आणि त्या 60 दिवसात मी फक्त खिचडी खाल्ली, तीही स्वतःच बनवली.", असंही एका मुलाखतीमध्ये पंकज त्रिपाठी यांनी सांगितलं. देश पहले, हिंदू तन मन, हिंदू जीवन, रग-रग हिंदू मेरा परिचय ही मैं अटल हूं या चित्रपटातील गाणी काही दिवसांपूर्वी रिलीज करण्यात आली. आता प्रेक्षक या चित्रपटाची उत्सुकतेने वाट बघत आहेत. रवी जाधव दिग्दर्शित 'मैं अटल हूं' हा चित्रपट 19 जानेवारीला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची कथा भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनावर आधारित आहे. 'मैं अटल हूं' या चित्रपटासोबतच पंकज हे लवकरच स्त्री 2 आणि मिर्झापूर 3 मध्ये दिसणार आहे.

## महाराणी-3 चा जबरदस्त टीझर

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री हुमा कुरेशीनं (HUMA QURESHI) अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केलं आहे. पण गेल्या काही महिन्यांपासून ती ओटीटीवर देखील अधिराज्य गाजवत आहे. हुमा कुरेशीच्या महारानी (MAHARANI) या वेब सीरिजचा प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. या वेब सीरिजचे दोन सीरिज प्रेक्षकांच्या भेटीला आले. या दोन्हीही सीझन्सला प्रेक्षकांची पसंती मिळाली. आता या मालिकेचा तिसरा सीझन प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज झाला आहे. महारानी-3 चा टीझर नुकताच रिलीज करण्यात आला आहे. या टीझरनं अनेकांचे लक्ष वेधले आहे.हुमाच्या 'महाराणी सीझन 3' टीझर रिलीज झाला आहे. या टीझरमध्ये हुमाची जबरदस्त एन्ट्री दाखवण्यात आली आहे. टीझरमध्ये राणी हातात हातकडी घालून जेल व्हॅनमधून बाहेर पडताना दिसत आहे. तिच्या हातात पुस्तक दिसत आहे. ती व्हॅनमधून बाहेर आल्यानंतर सर्वांना अभिवादन करते. "जब हम चौथी फेल थे तो आप सबकी नाक में दम कर दिए थे. ग्रेजुएट हो जाएंगे तो क्या होगा आप सबका...." हा हुमाचा डायलॉग टीझरमध्ये ऐकू येतो. महारानी चित्रपटाचा टीझर हुमानं सोशल मीडियावर शेअर केला आहे. या टीझरला तिनं कॅप्शन दिलं, "परीक्षा की तैयारी है जारी, फिर आ रही है महारानी!"

## 12 वी फेल' चं आलियानं केलं कौतुक

विधू विनोद चोप्रा यांचा 12 वी फेल (12TH FAIL) हा चित्रपट 27 ऑक्टोबर 2023 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाचं अनेकांनी कौतुक केलं. पण हा चित्रपट ओटीटीवर रिलीज झाल्यानंतर देखील या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या चित्रपटातील अभिनेता विक्रांत मेसी (VIKRANT MASSEY) आणि मेधा शंकर यांचे अनेकांनी कौतुक केलं आहे. काही दिवसांपूर्वी अभिनेता हृतिक रोशननं 12 वी फेल या चित्रपटाचं कौतुक केलं आता अभिनेत्री आलिया भट्टनं (ALIA BHATT) देखील या चित्रपटाचं कौतुक केलं आहे.आलियानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिलं, "मी पाहिलेल्या सर्वात सुंदर चित्रपटांपैकी एक हा चित्रपट आहे. खूप सुंदर!!!! विक्रांत मेसी तू खूप छान काम केलं आहे, मला आश्चर्य वाटले! मेधा शंकर मनोजच्या प्रवासामध्ये तू महत्वाची आहेस. सर्वकाही खूप खास, फ्रेश आणि हृदयस्पर्शी आहे. अनंत जोशी तुम्ही उत्कृष्ट आहात! आणि विधू विनोद चोप्रा सर - हा चित्रपट खरोखरच हिट झाला! हा प्रेरणादायी चित्रपट आहे. चित्रपटाच्या संपूर्ण कलाकार आणि क्रूचे कौतुक" आलियानं शेअर केलेली ही पोस्ट विक्रांत मेसीनं रिपोस्ट केली आहे. '12वी फेल' चित्रपटाचे दिग्दर्शन विधू विनोद चोप्रा यांनी केले. या चित्रपटात विक्रांत मेसी आणि मेधा शंकर यांच्याशिवाय अनंत व्ही जोशी आणि अंशुमन पुष्कर यांनी देखील महत्वाची भूमिका साकारली. हृतिकनं ट्विटरवर ट्वीट शेअर करुन 12 वी फेल या चित्रपटाचे कौतुक केले. हृतिकने 12 वी फेल या चित्रपटाचे कौतुक केले आहे पण नेटकऱ्यांनी एका कारणामुळे त्याला ट्रोल केलं आहे. हृतिक त्याच्या ट्वीटमध्ये चित्रपटाचे दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा यांचा उल्लेख केला आहे परंतु त्याने चित्रपटाच्या मुख्य अभिनेत्याचा म्हणजे विक्रांत मॅसीचा कुठेही उल्लेख केलेला नाही. हृतिकच्या या चुकीमुळे नेटकऱ्यांनी त्याला ट्रोल केलं. पण हृतिकनं केलेली ही चूक मात्र आलियानं टाळली.



## ट्विंकल खन्ना वयाच्या 50 व्या वर्षी पदवीधर!

अक्षय कुमारची पत्नी आणि अभिनेत्री ट्विंकल खन्ना हिने लग्नानंतर फिल्मी जगताला अलविदा केला आहे. ट्विंकल खन्नाने अभिनय सोडून काही वर्षांपूर्वी लेखिका बनली होती. त्यांनी आतापर्यंत चार पुस्तके लिहिली आहेत. दरम्यान ट्विंकल खन्नाने काही वर्षांपूर्वी सोडलेले शिक्षण पूर्ण केले. ट्विंकल खन्नाने काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत सांगितले होते की तिने तिचा मुलगा आरवसह विद्यापीठात प्रवेश घेतला होता. आता अभिनेत्री ट्विंकल खन्नाने शिक्षण पूर्ण केले असून पदवीही मिळवली आहे. अभिनेता अक्षय कुमारने इंस्टाग्रामवर एक फोटो शेअर करून याबाबत माहिती दिली आहे. कोरोनानंतर ट्विंकल खन्नाने पुन्हा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आणि लंडन विद्यापीठात फिक्शन रायटिंग मास्टर प्रोग्राममध्ये प्रवेश घेतला. आता ट्विंकलचा अभ्यास पूर्ण झाला असून तिला पदवीही मिळाली आहे. फोटो शेअर करताना अक्षय कुमारने लिहिले की, दोन वर्षांपूर्वी जेव्हा तू मला सांगितले होते की तुला पुन्हा अभ्यास करायचा आहे. मला विश्वास बसला नव्हता."दोन वर्षांपूर्वी जेव्हा तू मला सांगितले होते की तुला पुन्हा अभ्यास करायचा आहे, तेव्हा मला आश्चर्य वाटले की तु हे काय म्हणत आहे. पण ज्या दिवशी मी तुला खूप मेहनत आणि घर, करिअर, मी आणि मुलांसह संपूर्ण विद्यार्थी जीवन उत्तम प्रकारे सांभाळताना पाहिले. तेव्हा मला कळाले की मी एका सुपर स्त्रीशी लग्न केले आहे. आज तुला पदवी मिळाली, टीना, मला तुझा किती अभिमान आहे हे सांगण्यासाठी पुरेसे शब्द जाणून घेण्यासाठी मला थोडा अधिक अभ्यास करावा लागले.

## अनुष्का ला मिळालं मंदिराच्या उद्घाटनाचं निमंत्रण

उत्तर प्रदेशातील अयोध्येत 22 रोजी होणाऱ्या राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याची तयारी जोरात सुरू आहे. अनेक कलाकारांना तसेच विविध क्षेत्रातील दिग्गज मंडळींना राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याचं निमंत्रण देण्यात आलं आहे. अभिनेत्री अनुष्का शर्मा आणि क्रिकेटर विराट कोहलीला राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याचे आमंत्रण मिळाले आहे. या दोघांचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ज्यामध्ये दिसत आहे की, विरुष्काच्या हातात राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याची आमंत्रणपत्रिका आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटोमध्ये अनुष्का शर्मा ही पांढऱ्या रंगाचा अलारकली सूट आणि मोकळे केस अशा सिंपल लूकमध्ये दिसत आहे. तर विराट कोहली डेनिम शर्ट आणि पांढरी पँट अशा लूकमध्ये दिसत आहे. राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याचे इतर कलाकारांना देखील निमंत्रण मिळाले आहे. गायिका आशा भोसले यांनाही निमंत्रण मिळाले आहे. तसेच बॉलिवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील कलाकारांना देखील आमंत्रित करण्यात आलं आहे. रणबीर कपूर, आलिया भट्ट, अक्षय कुमार, अनुपम खेर, माधुरी दीक्षित, देवगण यांनाही या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी निमंत्रणपत्रिका देण्यात आली आहे.



# हार्दिक पांड्यासाठी धोक्याची घंटा!

## » तिसऱ्या टी-20 मध्ये सॅमसनला मिळू शकते संधी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था






**स्टार अष्टपैलू हार्दिक पांड्याचं (HARDIK PANDYA) टीम इंडियातील कमबॅकचा प्रश्न अधिकच कठीण होत चालला आहे. वनडे विश्वचषकात हार्दिक पांड्याला दुखापत झाली होती. तेव्हापासून तो टीम इंडियाबाहेर आहे. हार्दिक पांड्या आपल्या फिटनेसवर मेहनत घेत आहे, पण तो मैदानात कधी कमबॅक करणार? याबाबत कोणतीही अपडेट समोर आलेली नाही. त्यातच शिवब दुबे (SHIVAM DUBEY) ज्या पद्धतीने फॉर्ममध्ये आहे, ते पाहता हार्दिक पांड्याचं टीम इंडियातील कमबॅक कठीण होऊन बसलं आहे. त्यातच रोहित शर्मा (ROHIT SHARMA) दीड वर्षानंतर टी 20 संघात परतला आहे.**

हार्दिक पांड्याच्या अनुपस्थितीत टीम इंडियाने शिवब दुबे याच्यावर डाव खेळला. अफगाणिस्तानविरोधातील टी 20 मालिकेत शिवब दुबे याने प्रभावी कामगिरी करत निवड सार्थ असल्याचे दाखवून दिले. दोन सामन्यात त्याने बॅट आणि चेंडूने कमाल केली. पहिल्या दोन्ही टी 20 सामन्यात शिवब दुबे याने नाबाद अर्धशतके ठोकली. शिवब दुबेच्या या कामगिरीमुळे बीसीसीआय सेंट्रेल कॉन्ट्रॅक्टमध्ये त्याचा समावेश कऱणार असल्याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. जर असे घडले आणि शिवम दुबेचा आयपीएलमध्येही फॉर्म कायम राहिला तर त्याची टी-20 विश्वचषक खेळण्याची शक्यता आणखी वाढतेय.

त्यामुळे हार्दिक पांड्याला टीम इंडियात कमबॅक करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागणार आहे.हार्दिक पांड्याची दुखापत लक्षात घेऊन बीसीसीआयने आपला बॅकअप प्लॅन तयार केला आहे. रोहित शर्माचे तब्बल 14 महिन्यांनंतर टी-20 संघात पुनरागमन झाले आहे. पहिल्या दोन सामन्यात रोहितला फलंदाजीत लौकिकास साजेशी कामगिरी करता आली नाही. पण रोहितकडे स्वतःला सिद्ध करण्यासाठी आयपीएलचा संपूर्ण हंगाम आहे.

रोहितला आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करता आली तर त्याला संघाचे कर्णधारपद मिळणार हे निश्चित मानले जातेय. अशा स्थितीत टी 20 विश्वचषकात हार्दिक पांड्याला संधी मिळणार का? असाही सवाल उपस्थित होतोय.हार्दिक पांड्या सध्या फिटनेवर काम करतोय. त्याचे व्हिडिओ सोशल मीडियात समोर आले आहे. पण तो मैदानावर कधी परतणार? याबाबत कोणतीही अपडेट नाही. हार्दिक पांड्या आयपीएलदरम्यान मैदानात परतणार असल्याचे वृत्त समोर आलेय. मुंबई इंडियन्सने रोहित शर्माला डावलत हार्दिक पांड्याला कर्णधार केलेय.जर हार्दिक पांड्या आयपीएलच्या सुरुवातीच्या सामन्यात खेळला नाही तर मुंबईच्या संघाचे नेतृत्व कोण करणार? असा सवालही उपस्थित राहिला आहे. तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत भारतीय संघ अफगाणिस्तानवर २-०ने आघाडीवर आहे.

आता टीम इंडियाच्या नजरा मालिकेतील शेवटच्या आणि तिसऱ्या सामन्यावर लागल्या आहेत. भारताला हा सामना जिंकून आपली विजयी घोडदौड कायम राखायची असून मालिकेत क्लीन स्वीप करायचा आहे. दुसरीकडे, अफगाणिस्तानला या सामन्यात पुनरागमन करून शेवट गोड करत मायदेशी परतायचे आहे. दोन्ही संघांना बंगळुरूमध्ये आपण विजय मिळवू अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी संजू सॅमसनचाही टीम इंडियामध्ये समावेश करण्यात आला आहे. मात्र, दोन्ही सामन्यांच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये संजू सॅमसनचा अद्याप समावेश झालेला नाही. त्याच्या जागी दुसरा यष्टीरक्षक फलंदाज जितेश शर्माला दोन सामन्यांमध्ये संधी देण्यात आली. आता जितेश शर्माला विश्रांती देऊन तिसऱ्या सामन्याच्या प्लेईंग इलेव्हनमध्ये संजू सॅमसनचा समावेश होण्याची शक्यता आहे.

### कमबॅकचा प्रश्न अधिकच कठीण

» भारत आणि अफगाणिस्तानचे संघ आतापर्यंत ७ वेळा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात आमनेसामने आले आहेत. अफगाणिस्तानने भारताविरुद्ध येथे एकदाही विजय मिळवलेला नाही. अफगाण संघाला ६ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला असून एक सामना अनिर्णित राहिला आहे. अशा परिस्थितीत पुढील टी-२० मध्येही टीम इंडियाचा वरचष्मा असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील या सामन्याचे थेट प्रक्षेपण स्पोर्ट्स-१८च्या विविध चॅनेलवर केले जाईल. लाइव्ह स्ट्रीमिंग जिओ सिनेमा ॲपवर उपलब्ध असेल.भारत विरुद्ध अफगाणिस्तान यांच्यातील टी-२० मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना १७ जानेवारी रोजी होणार आहे. या सामन्यात दोन्ही संघ भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता एम.चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू येथे खेळतील. भारताने याआधीच मालिका काबीज केली आहे, आता तिसरा टी-२० सामना जिंकून मालिका क्लीन स्वीप करण्याचे टीम इंडियाचे लक्ष्य आहे. चाहत्यांना हा सामना कधी, कुठे आणि कसा विनामूल्य पाहता येईल ते जाणून घेऊ या.स्टार अष्टपैलू हार्दिक पांड्याचं (HARDIK PANDYA) टीम इंडियातील कमबॅकचा प्रश्न अधिकच कठीण होत चालला आहे. वनडे विश्वचषकात हार्दिक पांड्याला दुखापत झाली होती. तेव्हापासून तो टीम इंडियाबाहेर आहे.

# हार्दिकनं गुजरात सोडल्यानंतर शामी पहिल्यांदाच बोलला

## » मुंबई इंडियन्सने हार्दिक पांड्याला केले गुजरात टायटन्सकडून ट्रेड

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अष्टपैलू हार्दिक पांड्या गुजरात टायटन्सची साथ सोडत मुंबई इंडियन्समध्ये सामील झाला. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात गुजरातने सलग दोनवेळा फायनलमध्ये प्रवेश मिळवला होता. एकवेळा गुजरातने जेतेपद पटकावलेय. यंदा हार्दिक पांड्या मुंबईच्या जर्सीमध्ये दिसणार आहे. मुंबई इंडियन्सने रोहितला डावलत हार्दिक पांड्याकडे कर्णधारपदाची धुरा सोपवली.**



हार्दिक पांड्याने गुजरातची साथ सोडल्यानंतर मोहम्मद शामीने पहिल्यांदाच स्पष्टपणे वक्तव्य केलेय. कुणाच्या जाण्याने काही फरक पडत नाही, असे वक्तव्य मोहम्मद शामी याने केलेय. हार्दिक पांड्याने साथ सोडल्यानंतर गुजरातने कर्णधारपदाची धुरा शुभमन गिल याच्या खांद्यावर सोपवली आहे.2024 आयपीएलमध्ये गुजरातची धुरा शुभमन गिल याच्या खांद्यावर असेल. हार्दिक पांड्याच्या अनुपस्थितीत गुजरात टायन्सनचं कामगिरी कशी राहणार? या प्रश्नांचं उत्तर मोहम्मद शामी याने दिलेय. कुणाच्या जाण्याने काही फरक पडत नाही, असे शामी म्हणालाय. सोशल मीडियावर मोहम्मद शामीचा एक व्हिडीओ व्हायरल होतोय. व्हायरल व्हिडिओमध्ये एक पत्रकार मोहम्मद शमीला विचारले की, हार्दिक पांड्या गुजरात टायटन्समधून बाहेर पडल्यानंतर किती फरक पडेल? या प्रश्नाच्या उत्तरात मोहम्मद शमी म्हणतो की, कोणीही साथ सोडली तरी काही फरक पडत नाही. नुकताच आयपीएलचा लिलाव पार पडला. पण या लिलावापूर्वी मुंबई इंडियन्सने हार्दिक पांड्याला गुजरात टायटन्सकडून ट्रेड केले. मागील हंगामात मुंबई इंडियन्सकडून खेळणारा ऑस्ट्रेलियन अष्टपैलू कॅमेरून ग्रीन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा भाग बनला. मात्र, हार्दिक पांड्या आपल्या जुन्या संघात परतला. हार्दिक पांड्याने आपल्या कारकिर्दीची सुरुवात मुंबई इंडियन्समधून केली होती. आयपीएल 2015 च्या मोसमात तो पहिल्यांदा खेळला. आता तो मुंबई इंडियन्सचा कर्णधार असेल. मुंबईने रोहितला डावलत हार्दिक पांड्याला कर्णधार म्हणून नियुक्त केलेय. हार्दिक पांड्याने त्याच्या कारकिर्दीत आतापर्यंत 123 आयपीएल सामने खेळले आहेत. या सामन्यांच्या 115 डावात फलंदाजी करताना त्याने 30.38 च्या सरासरीने आणि 145.86 च्या स्ट्राईक रेटने 2309 धावा केल्या आहेत. या काळात त्याने 10 शतके झळकावली आहेत. याशिवाय त्याने गोलंदाजीत 33.26 च्या सरासरीने 53 बळी घेतले आहेत.

### हार्दिक पांड्या मुंबईच्या जर्सीमध्ये

» अष्टपैलू हार्दिक पांड्या गुजरात टायटन्सची साथ सोडत मुंबई इंडियन्समध्ये सामील झाला. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात गुजरातने सलग दोनवेळा फायनलमध्ये प्रवेश मिळवला होता. एकवेळा गुजरातने जेतेपद पटकावलेय. यंदा हार्दिक पांड्या मुंबईच्या जर्सीमध्ये दिसणार आहे.